आत्मचरित्र केवळ आत्मचरित्रात्मक वाङ्मयातच नव्हे तर मराठी वाङ्मयात सुध्दा ` अमर ` स्वरुपाचे अेक लेणे होअून असले आहे. अशा या साहित्यकृतीचा मी अभ्यास केला आहे. आणि मला जाणवलेले काही निष्कर्ष साधार मांडले आहेत.

` स्मृतिचित्रे ` तील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास - असे शोधनिबंधाचे शीर्षक असले तरी हा शोधनिबंध केवळ व्यक्तिचित्रापुरतीच मर्यादित दृष्टि ठेवणारा नाही. वर अुल्लेखिल्याप्रमाणे वाङ्मयीन आणि सामाजिक अशा दृष्टीने ` स्मृतिचित्रे ` ची पाहणी करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

या कार्यात प्रस्तुतच्या शोधनिबंधाचे मार्गदर्शक शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रपाठक, डॉ. ल.रा. नसिराबादकर यांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन, लेखन-वाचन या संदर्भात केलेल्या सूचना व वेळोवेळी केलेले सहकार्य याचा गौरवाने अुल्लेख करावासा वाटतो. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाशिवाय या शोधनिबंधाला मूर्त स्वरुप आले नसते. म्हणून त्यांचे कृतज्ञतापूर्वक ऋण मान्य करावे लागेल. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. गो.मा. पवार यांनीही वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याशिवाय संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथील मराठी विभागाचे प्रमुख डॉ.निर्मलकुमार फडकुले यांनी लेखनासंबंधी बहुमोल मार्गदर्शन केले. त्याच महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. राजशेखर हिरेमठ यांच्याशी लेखनासंदर्भात केलेली चर्चा अत्यंत अुपयुक्त ठरली. आमच्या सोलापूर सोशल असोसिअेशन आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. अेच. अेम. शेख व डॉ. आय.अे.बी. शेख यांनी दिलेली प्रेरणा व कॉलेजचे विद्यमान प्राचार्य अेम.अेन. वडवान यांचे प्रोत्साहन कार्यसिध्दीस कारणीभूत ठरले.

सदर शोधनिबंधासाठी सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर , संगमेश्वर कॉलेज सोलापूर, वालचंद कॉलेज सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ, सोलापूर , हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथील ग्रंथालयांचे संदर्भासाठी फार सहाय्य लाभले. या शोधनिबंधाच्या टंकमुद्रित प्रती तयार करण्याचे काम कोठावळे टायपिंग सेंटरचे श्री. रविंद्र कोठावळे यांनी काळजीपूर्वक करुन दिले. या सर्व व्यक्ती व संस्था यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य आहे.

- मीर इस्हाक शेख .

.....